अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई विभाग यांचे कार्यालय, ९१
सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
☎ २४९२१२१२, २४९२२६१८
E-Mail :
addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक १४.०९.२०२३

—: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि | मुंबई विभाग |
| गु.नो.क्र | ३०/२०२३ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालयाचा पत्ता | श्री. शैलेश रघुनाथ येवले वय ५६ वर्षे, पद — उप अभियंता, मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळ, कार्यकारी अभियंता, ग—दक्षिण विभाग, यांचे कार्यालय लोअर परेल,मुंबई, राठी :— ४०२, मंगला प्रसाद, गणेश वाडी रोड,टीएमसी ऑफिस जवळ, पाचपाखाडी, ठाणे पश्चिम ठाणे ४००६०२ |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रू. ५०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. ५०,०००/— |
| हस्तगत केलेली रक्कम | रू. ५०,०००/— |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी यांच्या वडीलांची बिल्डींग रिपेरींग कॉन्ट्रॅक्टर कंपनी असुन फिर्यादी हे त्यांचे वडीलांचे अधिकारपत्रान्वये नमुद कंपनीचे सर्व कामकाज पाहतात व सदर कंपनी ही म्हाडामध्ये नोंदणीकृत असुन फिर्यादी यांचे कंपनीने म्हाडाद्वारे मिळालेल्या सिध्दीप्रभा इमारत जी/एस वॉर्ड, प्रभादेवी या इमारतीचे रिपेरींगचे काम केलेले आहे. सिध्दीप्रभा येथील कामासंदर्भात फिर्यादी यांचे कंपनीने म्हाडास परफॉर्मन्स सिक्युरीटी डिपॉझीट ( पी.एस.डी ) पोटी रू २६,८६,२००/— भरले होते. त्याप्रमाणे सदर काम वेळेत पूर्ण करून कामाचे तीसरे व अंतिम रू २५,७१,५३९/— एवढे बील म्हाडामधील लोकसेवक यांचे कार्यालयात आर्किटेकद्वारे प्राप्त होते व सदरचे बील लोकसेवक यांनी मंजुरीसाठी वरिष्ठांकडे पाठविलेले होते.<br>त्यानंतर यातील फिर्यादी यांनी सदर काम पूर्ण झाल्याने त्यांनी सदरकामाकरीता भरलेले पी.एस.डी म्हाडाकडुन रिलीजकरण्याकरीता यातील फिर्यादी यांनी नमुद कार्यालयामध्ये अर्ज केला होता त्यानंतर फिर्यादी हे लोकसेवक यांना भेटले असता, लोकसेवक यांनी फिर्यादी यांचे नमुद केलेल्या कामाचे म्हणजेच पूर्वी मंजुरीसाठी पाठविलेल्या बीलाच्या ५ टक्केप्रमाणे तसेच पी.एस.डी.साठी आणखी काही पैसे द्यावे लागतील तरच पी.एस.डी रिलीज करण्यात येईल असे सांगुन फिर्यादी यांचेकडे लाचेची मागणी केली.<br>परंतु यातील फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. ०६/०९/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई या कार्यालयात लेखी तक्रार केली होती. सबब प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता लोकसेवक यांनी तडजोडीअंती लाच रक्कम रू.५०,०००/— मागणी केली.<br>त्याप्रमाणे आज दि. १४/०९/२०२३ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे यांना लाच रक्कम रू ५०,०००/— पंचासमक्ष स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले म्हणुन गुन्हा नोंद. |

<u>मार्गदर्शन अधिकारी</u> : श्री विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
**मुंबई विभाग,मुंबई**

सहाय्यक पोलीस आयुक्त

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा. <u>संपर्क :</u> लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३० <u>टोल फ्रि. क्र.</u> १०६४ <u>दुरध्वनी क्र.</u> ०२२ २४९२१२१२ <u>फॅक्स. क्र.</u> ०२२२४९२२६१८,

<u>संकेतस्थळ</u> : acbmaharastra.gov.in

<u>ई.मेल</u> : acbwebmail@mahapolice.gov.in, <u>addlcpacbmumbai@mahapolice.gov.in</u>.,

<u>मोबाईल अॅप</u> : www.acbmaharastra.net., <u>फेसबुक</u> : www.facebook.com- Maharashtra ACB